NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

महाराष्ट्र शासन

# उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे.

प्रादेशिक मनोरुग्णालय आवार, ठाणे (प) ४००६०४

आज़ादी का अमृत महोत्सव

कार्यालय दूरध्वनी क्र.:- ०२२-२५८१५०३० | ई-मेल:- ddhsthane@rediffmail.com/nrhmthanecircle@rediffmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र.राआअ/कंत्राटी वाहनाकरीता दरपत्रक/3262१/२५
दिनांक : १४/१०/२०२५

प्रति,

\------------------------

\------------------------

विषय: सन २०२५-२०२६ करीता कार्यालयीन मासिक तत्वावर / Monthly Basis/On Call Basis / दैनिक तत्वावरआवश्यक असेल त्याच दिवशी अथवा निश्चित क्षेत्रिय भेटीकरीता कंत्राटी वाहनाकरिता दरपत्रके मागविण्याबाबत...

संदर्भ :- या कार्यालयांची मंजूर टिप्पणी दि १४/१०/२०२५ .

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन उपसंचालक आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे हे मंडळ कार्यालयातील तसेच ठाणे/रायगड/पालघर व मुंबई,उपनगर व आठ महानगरपालिकीतील आरोग्य संस्थेमध्ये विविध कामकाजकरीता तसेच कार्यालयीन नित्याच्या वापरात वाहनाची दैनंदिन कामकाजासाठी आवश्यकता असेल तसेच सहा. संचालक (वैद्य) व CPMU कक्षास वरिष्ठ कार्यालयाने दरमहा ठरवून दिलेल्या भेटी आरोग्य संस्थेस करणे गरजेचे असते तरी सदर मार्गदर्शक सुचनेच्या अधिन राहून मा उपसंचालक,मा.सहा संचालक ( वैद्यकीय) व CPMU कक्षास ठाणे/रायगड/पालघर , मुंबई ,उपनगर व आठ महानगरपालिकांतील व जिल्हयातील आदिवासी भागातून तसेच १५ वित्तीय आयोगाचा भेटी करीता भेटीसाठी वाहन न्यावे लागते, तरी त्यासाठी मासिक तत्वावर / Monthly Basis/On Call Basis / दैनिक तत्वावर कार्यालयाकरीता निकडीची बाब म्हणून वाहन आवश्यक असून त्याकरीता दरपत्रके स्थानिक स्तरावरुन मागविण्यात येत आहेत. दरपत्रके सादर करताना त्यामध्ये खालील तपशील नमूद असणे आवश्यक आहे. सदरची दरपत्रके उपसंचालक कार्यालयांच्या फलकावर प्रसिध्द केलेल्या दिनांकापासून कार्यालयीन कामाचे ७ दिवसाच्या आत ( सुट्टीचे दिवस वगळून ) दि १४/१०/२५ ते दि २८/१०/२५ पर्यंत दरपत्रके या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सिलबंद लखोटयात सादर करावीत.तसेच खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून जी दरपत्रके विहित मुदतीत सादर होणार नाही ती दरपत्रके ग्राहय धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी

<u>अटी व शर्ती</u>

१) पुरवठादार /ट्रॅव्हल्स संस्था / किव्हा वाहन चालक यांचेकडुन मासिक व दैनंदिन कामासाठी ( २४ तास ) वाहन पुरविण्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहे.

२) पुरवठादार किंवा ट्रॅव्हल्स संस्था यांनी मासिक व on call basis/as on required दैनदिन किवा गरजेनुसार कामासाठी वाहन पुरविण्याकरीता सर्व करासहित स्वतंत्र दर सादर करण्यात यावेत.

३) मागील तीन वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र सन २०२१-२२,२०२२-२३,२०२३-२४ .

४) मुंबई दुकाने, Shop Actव आस्थापना कायदा १९४८ अंतर्गत नोंदणी केलेले वैध प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५) संबंधीत एन्जसीकडे/Travels/( वाहन मालक ) पुरविण्याचा अनुभवाचे प्रमाणपत्र ( सरकारी,निमसरकारी,स्वायत्त संस्था ) कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

६) दरपत्रके सादर करणारी संस्था शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळ्या यादीत टाकलेली नसावी . (याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे )

७) टॅन/ पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

८) आपण दरपत्रकामध्ये सादर केलेली संपुर्ण माहिती अचुक असल्याबाबत रु १००/- स्टॅम्प पेपरवर रजिस्टर्ड ( नोटरी ) शपथपत्र ( हमीपत्र ) सादर करणे बंधनकारक आहे.

९) दरपत्रक प्रक्रियेने मासिक तत्वावर वातानुकुलीत वाहन (२२०० कि मी पर्यंत Night Hault सहीत) यामध्ये,GST ,टोल ,पार्किंग पकडून दर नमूद करावेत. तसेच वाहन या कार्यालयात २४ X ७ उपलब्ध असणे बंधनकारक राहील.

१०) तसेच Monthly Basis/मासिक तत्वावर/On Call Basis/ दैनिक तत्वावर वातानुकुलीत वाहनचालकासोबत वाहन ( ३०० कि .मी .पर्यंत) यामध्ये GST,टोल, पार्किंग पकडून तसेच ज्या वेळेस वाहन या कार्यालयात बोलावले जाईल त्या वेळेपासून पुढे २४ तास याप्रमाणे वाहन पुरवणे बंधनकारक राहील.

११) वाहनाचे मॉडेल जानेवारी २०२१-२२ अथवा त्या नंतरचे असावे .तत्पूर्वीच्या वाहनाचा विचार केला जाणार नाही.वाहनांची नोंदणी महाराष्ट्र राज्यामध्ये केलेली असावी.

१२) वाहन दर महिन्याला किमान २२०० कि.मी. चालेल त्याकरिता दर नमूद करावेत.

१३) मासिक तत्वावरील वाहन प्रति महा २२०० कि.मी.च्या वर अतिरिक्त धाव झाल्यास झालेली अतिरिक्त धाव ही नमूद प्रति कि.मी दराप्रमाणे नमूद करावी .

१४) इंधन,वंगण,किरकोळ अथवा मोठा स्वरुपाची दुरुस्ती,टोलनाका व वाहन चालकाचा संपूर्ण खर्च ( वेतन,प्रवास,भोजन,नाईट होल्ट,TA /DA इत्यादी भत्ता ) ठेकेदारास करावा लागेल.

१५) वाहन सदैव सुस्थितीत असणे आवश्यक आहे .मंजूर ठेकेदार प्रतिमहा करार कालावधीत वाहन २४ तास मुख्यालयाच्या ठिकाणी उपलब्ध असणे बंधनकारक राहील .वाहनाचा वापर ग्रामीण भागात ,डोंगराळ व अतिदुर्गम भागातही व राज्यस्तर राज्यभरासाठी आवश्यकतेनुसार केला जाईल.तसेच Monthly Basis/मासिकतत्वावर/On Call Basis/ दैनिक तत्वावर वाहनाचा वापर ग्रामीण भागात, डोंगराळ व अतिदुर्गम भागातही व राज्यस्तर राज्यभरासाठी आवश्यकतेनुसार केला जाईल

१६) भाडयाने लावलेले वाहन कोणत्याही दिवशी वाहनाची प्रवासी वाहतूक अथवा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आलेस उपसंचालक, आरोग्य सेवा मुंबई मंडळ ठाणे या कार्यालयाकडून वाहन तात्काळ निलंबित करण्यात येईल.

१७) वाहनास कोणत्याही प्रकारचा अपघात झाला तर त्याची संपूर्ण जबाबदारी वाहन ठेकेदारावर राहील व याकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडून कोणत्याही प्रकारची भरपाई मिळणार नाही. सेवा पुरवतेवेळी वाहनास किवा तिऱ्हाईतांचे अपघात होऊन नुकसान झाले तर सदरील नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.यासंबधीची पूर्ण जबाबदारी कंत्राटदार /एजेन्सी /संस्थेची राहील.

१८) वाहनाचा अपघात झाल्यास अथवा किरकोळ किंवा मोठी दुरुस्ती निघाल्यास सदरहू वाहना ऐवजी पर्यायी वाहन तात्काळ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही वाहन ठेकेदाराची राहील. याकरिता अतिरिक्त दराने भार प्रदान केले जाणार नाहीत.

१९) भाड्याने दिलेले वाहन नादुरुस्त झाल्यास ठेकेदाराने पर्यायी वाहन उपलब्ध करून न दिल्यास या कार्यालयाकडून दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करून घेण्यात येऊन त्याचे भाडे ठेकेदाराच्या देयकातून कापून घेण्यात येईल .वाहन दुरुस्तीकरिता गेल्यानंतर त्याचा गैरवापर झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी वाहनाच्या ठेकेदारावर राहील.वाहन दुरुस्तीसाठी होणारी धाव कामकाजाच्या धावेत समाविष्ट करण्यात येऊ नये.

२०) प्रत्येक महिन्याचे लॉगबुक हे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबधित अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतर प्रत्यक्ष लॉगबुकातील किमी. च्या आधारे निविदा निश्चित दराने देयके तयार करुन पुढील महिन्याच्या १० तारखेच्या आत स्वाक्षरीसह सादर केल्यानंतर निधी, PIPउपलब्धतेनुसार देयकाची अदायगी केली जाईल.

२१) मासिक भाडयाने व दैनंदिन वाहन घेण्याच्या प्रस्तावित नियम, अटी व शर्तीमध्ये पुर्णतः अथवा अंशत: बदल करण्याचे अधिकार, अटी, शर्तीबाबतचा वाद, अटी व शर्तीचा अर्थ लावण्याचा अधिकार मा. अध्यक्ष तथा उपसंचालक ,आरोग्य सेवा ,मुंबई मंडळ ठाणे यांना राहतील.

२२) मान्यता प्राप्त विमा कंपनीकडून वाहनाचा व वाहनात बसणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचा विमा आवश्यक आहे. विम्याचे कागदपत्र वाहनासोबत ठेवणे आवश्यक आहे. मंजूर निविदाधारक कंत्राटदार/एजन्सी /संस्था यांच्या प्रत्येक वाहनाचा वैध अपघात विमा ( Full Insurance ) सहित असणे अनिवार्य आहे. वाहन ताब्यात असतांना जर अपघात विमा नूतनीकरण करणे आवश्यक असेल तर असे नूतनीकरण ठेकेदाराने त्याच्या स्तरावरून करणे आवश्यक आहे. करार वैध असण्याच्या कालावधीमध्ये दुर्दैवाने अपघात घडल्यास सदर अपघातामुळे झालेल्या

Scanned with OKEN Scanner

जीवित व वित्त हानीची कोणतीही जबाबदारी उपसंचालक ,आरोग्य सेवा .मुंबई मंडळ ठाणे कार्यालय स्वीकारणार नाही.

२३) वाहनचालकाकडून कोणत्याही प्रकारची टाळाटाळ किंवा बेशिस्त वर्तन केल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल .दरपत्रकातील अटी व शर्ती याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास मा.उपसंचालक.आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे यांचा निर्णय अंतिम राहील.असमाधानकारक काम ( उदा. वेळेवर गाडी उपलब्ध न होणे ,चालकाची वर्तणूक चांगली नसणे ) इ आढळून आल्यास करार रद्द करण्यात येईल.

२४) वाहनचालक याची संस्थेने खात्री करून घ्यावी की, वाहन चालक हा शिक्षित ,चांगली वर्तणूक असलेला गणवेशधारी व वाहतूक कायद्याची तसेच मंडळातील रस्ते व महामार्गाची माहिती असलेला ,वाहन चालक परवाना असलेला व अन्य आवश्यक ती कागदपत्रे असणारा असावा.

२५) सेवा पुरविताना नियमितपणा ,सचोटी,स्वच्छता ,आज्ञाधारकता व त्वरित कारवाई बाबत कोणतीही तडजोड होणार नाही.सदरील कार्यालयास सेवा पुरविताना कार्यालयाच्या इच्छेप्रमाणे कार्यवाही झाली नाही तर कोणतीही पूर्व सूचना न देता करार रद्द करण्यात येईल.

२६) वाहने ताब्यात देतेवेळी वाहनांची सर्व कागदपत्रे ( नोंदणीकर,विमा,फिटनेस) इ वैध असणे आवश्यक आहे.यापैकी कोणत्याही बाबीच्या अभावामुळे होणाऱ्या कोणत्याही परिणामांना हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.याची पूर्ण जबाबदारी आपली राहील.

२७) वाहनांचा वैध अपघात विमा (Third party Insurance)सहीत असणे अनिवार्य आहे .वाहन ताब्यात असतांना जर अपघात विमा नूतनीकरण करणे आवश्यक असेल तर असे नूतनीकरण ठेकेदाराने त्याच्या स्तरावरून करणे आवश्यक आहे.करार वैद्य असण्याच्या कालावधीमध्ये दुर्दैवाने अपघात घडल्यास सादर अपघातामुळे झालेल्या जीवित व वित्त हानीची कोणतीही जबाबदारी उपसंचालक ,आरोग्य सेवा,मुंबई मंडळ ठाणे कार्यालय स्वीकारणार नाही.

२८) आपण सादर केलेल्या देयकातून नियमानुसार आयकर, सेवाकर व त्यावरील अतिरिक्त कर कपात करण्यात येईल .ठेकेदारास कोणत्याही प्रकारची अग्रीम देण्यात येणार नाही.

२९) वाहनांच्या वापराबाबत वाहनांचे कर, विमा, प्रदुषण ईत्यादी बाबत शासनाच्या आस्तित्वात असलेल्या सर्व नियमांचे पालन करण्यास मंजूर निविदाधारक कंत्राटदारक./एजेन्सी /संस्था बांधील राहील.

३०) सुट्टीच्या दिवशी (म्हणजेच रविवार,सार्वजनिक सुट्ट्या कार्यालयामार्फत देण्यात आलेल्या सुट्ट्या ) इ दिवशी गरज भासल्यास आपले वाहन वापरण्यात येईल .महत्वाच्या कार्यक्रमादिवशी गरज भासल्यास आपणास पूर्वसूचना देण्यात येईल.

३१) वाहनधारकाने वाहन चालकासोबत एक मोबाईल हॅंडसेट देणे आवश्यक आहे .त्याचा खर्च वाहन धारकास करावा लागेल.

३२) वाहन चालक याचे जिल्हा शल्य चिकित्सक यांच्यामार्फत वैद्यकीय फिटनेस CERTIFICATE, स्वतः चे आधार कार्ड, PAN CARDव LICENSE COPYइत्यादींची XEROX COPYया कार्यालयात जमा करण्यात यावी ..तसेच वाहन चालकाला या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचा DRIVER भत्ता देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

३३) वाहन दौऱ्यावर/ फिरतीवर असतांना वाहनामध्ये पुरेसे इंधन असणे आवश्यक आहे व याची सर्वस्वी जबाबदारी वाहनमालकाची असेल.

३४) वाहनाचे PUC प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

३५) वाहनाचा नियुक्ती आदेश दिल्यापासून कार्यकाळ १२ महिने पर्यंत असेल परंतू काही कारणास्तव सदरील योजना बंद झाल्यास वाहन करार आपोआप संपूष्ठात येईल.

३६) जी .एस .टी .प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.नमूद दर CGST /GST व सर्वकरासहित नमूद करावे.

३७) न्युनतम दर असलेल्या संस्थेस कार्यारंभ आदेश दिल्यानंतर उपरोक्त सर्व अटीसह रु १००/- नोटरी STAMP पेपरवर करारनामा करणे बंधनकारक आहे.

टिप : ( दर हे RTO ने मंजूर केलेले असावेत .)

(डॉ. अशोक नांदापूरकर)
उपसंचालक,
आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे

Scanned with OKEN Scanner

उपसंचालक, आरोग्यसेवा, मुंबई मंडळ, ठाणे

राष्ट्रीय आरोग्य अभियान

Monthly Basis/मासिकतत्वावर/ On Call Basis/ दैनिक तत्वावर वातानुकुलीत वाहन पुरवण्याबाबत

| अ. क्र. | वाहनाचामेक मॉडेल | मासिक तत्वावर (वातानुकुलित वाहनाचे दर २२००कि.मी. रक्कम रू) वाहन २४ तास कार्यालयात असणे बंधनकारक आहे | २२०० कि.मी.च्यापुढे होणाऱ्या अतिरिक्त प्रत्येकी कि. मी. करिता आकारण्यात येणारे दर नमूद करावे | अ.क्र. | वाहनाचा प्रकार व मेक मॉडेल | As an when Required/ On Call Basis/दैनिक तत्वावर वापरासाठी एका पुर्ण दिवसाचे आकारण्यांत येणारे वातानुकुलित वाहनाचे भाडे रक्कम रूपये (३००किमीपर्यंत) (सर्वकरासह) | ३००किमीच्या पुढे होणाऱ्या अतिरिक्त प्रत्येकी कि. मी. करिता आकारण्यात येणारे दर नमूद करावे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इन्होवा | | | १ | इन्होवा | | |
| २ | ईटॉस | | | २ | ईटॉस | | |
| ३ | स्विफ्ट डिजायर | | | ३ | स्विफ्ट डिजायर | | |
| ४ | Brezza | | | ४ | Brezza | | |
| ५ | Ertiga | | | ५ | Wagon R | | |
| | | | | ६ | Bolero | | |
| | | | | ७ | Ertiga | | |

(डॉ. अशोक नांदापूरकर)

उपसंचालक,

आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे

Scanned with OKEN Scanner